**राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या**
**कार्यालयासाठी अतिरिक्त पदे मंजुरीबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : ग्रासंक-१२०७/प्र क्र ३७०२/ग्रासं-३
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ७ जून, २००८.

**प्रस्तावना** :-

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगासमोरील मोठ्या प्रमाणात प्रलंबित असलेल्या प्रकरणाची संख्या विचारात घेऊन राज्य आयोगासाठी आवश्यक अतिरिक्त पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.सदर बाब विचारात घेवून शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**-: शासन निर्णय :-**

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई या कार्यालयासाठी न्यायिक सदस्य-१, सदस्य-१ व आवश्यक कर्मचाऱ्यांची- ४ पदे याप्रमाणे पदनिर्मिती करावयाच्या प्रस्तावास राज्य मंत्री मंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार यासोबत जोडलेल्या परिशिष्टात नमुद करण्यात आल्याप्रमाणे न्यायीक सदस्य- १, सदस्य- १ व आवश्यक कर्मचाऱ्यांची- ४ पदे अशी एकूण ६ पदे निर्माण करण्यास शासन याद्वारे मंजूरी देत आहे.

२. परिशिष्टात नमूद करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची ४ पदे नियंत्रक, वैधमापनशास्त्र, महाराष्ट्र मुंबई यांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येत असून, सदरहू पदे शासनाच्या प्रचलित धोरणानुसार विहित मार्गाचा अवलंब करुन भरण्यात यावीत.

३. याबाबतचा होणारा खर्च मागणी क्रमांक एम-२,"२४०८-अन्न साठवण व वखार साठवण-०१-अन्न-१०१-प्रापण व पुरवठा (चार) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत राज्य परिषद, राज्य आयोग आणि जिल्हा मंचाची स्थापना (ए) मुंबई शहर (२४०८०२५१)०१" वेतनावरील खर्च या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २००८-०९ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक-४२०/व्यय-४/०७, दिनांक १७.०८.२००७ अन्वये मिळालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

शु.रा.शेठ
(शु.रा.शेठ)
अवर सचिव,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रत,

१) महालेखापाल-१ (लेखापरिक्षा), मुंबई.

२) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
३) वित्त विभाग,(व्यय-४), मंत्रालय, मुंबई.
४) वित्तीय सल्लागार व उप सचिव, मुंबई
५) अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई.
६) नियंत्रक, वैधमापनशास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
द्वारा - वित्तीय सल्लागार व उप सचिव, मुंबई
८) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
९) निवासी लेखा अधिकारी,मुंबई.
१०) प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई.
११) निवड नस्ती ( ग्रा. सं. ३)

## परिशिष्ट - अ

(शासन निर्णय क्रमांक : ग्रासंक-१२०७/प्र क्र ३७०२/ग्रासं-३, दिनांक : ७ जून, २००८ चे सहपत्र)

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई | न्यायिक सदस्य | १ | १६,७५०-२०,५०० |
| | | सदस्य | १ | रु.५००/- प्रति बैठक (अंशकालिक तत्वावर) किंवा दरमहा रु.१००००/- मानधन (पूर्णकालिक तत्वावर) |
| | | लघुलेखक (उच्चश्रेणी) | १ | ६५००-१०५०० |
| | | शिरस्तेदार | १ | ५५००-९००० |
| | | लिपिक-टंकलेखक | १ | ३०५०-४५९० |
| | | शिपाई | १ | २५५०-३२०० |
| | | एकूण पदे | ४+२ | |